# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १२५-२३** **दिनांक :- १४/०४/२०२३**

## चोरी, घरफोडी चोरी करणाऱ्या आरोपीतांस अटक करुन १० गुन्हयांची उकल वालीव पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

वालीव पोलीस ठाणे हद्दीतील सतत दिवसा व रात्री चोरी व घरफोडी चोरींच्या गुन्हयांमध्ये वाढत झाली होती. सदरबाबत वरिष्ठांनी गुन्हे उघडकीस आणणेबाबत व गुन्हयास पायबंद घालणेबाबत सुचना व मार्गदर्शन केले होते.

त्याअनुषंगाने वालीव पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार, तांत्रिक विश्लेषण व दिवसा व रात्री गुन्हे घडलेल्या घटनास्थळावरुन प्राप्त माहितीच्या आधारे आरोपीत नामे १) भावेश महेश वेदक, वय २२ वर्ष, रा. चिंचपाडा, वालीव, वसई (पुर्व), २) बद्रीआलम अकलाख चौधरी ऊर्फ पप्पु, वय ३० वर्ष, रा. रामरहीम चाळ, मोर्या नाका, सातिवली वसई यांना दिनांक ०७/०४/२०२३ रोजी ताब्यात घेवुन कौशल्याने तपास केला असता त्यांनी वालीव पोलीस ठाण्याचे हद्दीत १० गुन्हे केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करण्यात आली आहे. वर नमुद अटक आरोपीत यांचेकडुन सोन्याचे दागिने व इतर वस्तु असा एकुण ०३,४२,०००/- रुपये किंमतीचा चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे व खालीलप्रमाणे गुन्हे आहेत.

### -:घडकीस आलेले गुन्हे:-

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नंबर व कलम |
|---|---|---|
| १ | वालीव | गु.रजि.नं. २६१/२०२३ भा.द.वि.सं. कलम ४५४, ४५७ ३८०, ३४ |
| २ | वालीव | गु.रजि.नं. ३६३/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७९, ३४ |
| ३ | वालीव | गु.रजि.न. २५७/२०२३ भा.द.वि.सं. कलम ४५४, ४५७,३८०, ३४ |
| ४ | वालीव | गु.रजि.नं. २६०/२०२३ भा.द.वि.सं.कलम ४५४, ४५७, ३८०, ३४ |
| ५ | वालीव | गु.रजि.नं. ३२८/२०२३ भा.द.वि.सं.कलम ४५४, ४५७, ३८०, ३४ |
| ६ | वालीव | गु.रजि.नं. २०/२०२३ भा.द.वि.सं.कलम ४५४, ४५७, ३८०, ३४ |
| ७ | वालीव | गु.रजि.नं. ३६१/२०२३ भा.द.वि.सं.कलम ४५४, ४५७, ३८०,४११, ३४ |
| ८ | वालीव | गु.रजि.नं. ३६६/२०२३ भा.द.वि.सं.कलम ३७९, ३४ |
| ९ | वालीव | गु.रजि.नं. ३६५/२०२३ भा.द.वि.सं.कलम ४५७, ३८०, ३४ |
| १० | वालीव | गु.रजि.नं. ३६४/२०२३ भा.द.वि.सं.कलम ४५४, ३८० |

सदरची कामगिरी श्रीमती पोर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, वसई, श्री. चंद्रकांत जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पो.नि. श्री. राहुलकुमार पाटील (गुन्हे), गुन्हे प्रकटिकरण पथकाचे स.पो.नि. ज्ञानेश फडतरे, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, राजेंद्र फड, सतिष गांगुर्डे, पो.ना. बाळु कुटे, पो.अंम.गजानन गरीबे, अभिजीत गढरी यांनी केली आहे.




----oooo----